वरोरा शहरातील **गांधीसागर तलावाच्या** पर्यावरण संवर्धनासाठी नगरपरिषदेकडून राबवण्यात येणा-या प्रकल्पातील कामासाठी निधी मुक्त करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण विभाग, मंत्रालय,**
शासन निर्णय क्रमांकः रासयो-२०१२/प्र.क्र. १०२/तां.क. ३
नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांकः २८ मार्च,२०१३

वाचा:- विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दि. १३ मार्च,२०१३.

**प्रस्तावना:-**

राज्यातील तलाव, सरोवरे व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने राज्य योजनेतंर्गत राज्य सरोवर संवर्धन योजना सन २००६-०७ या वर्षापासून सुरू केली आहे. या योजनेतंर्गत सन २०१२-१३ या वर्षात वरोरा नगरपरिषद यांचेमार्फत प्राप्त गांधीसागर तलावाच्या प्रस्तावास संदर्भाधीन दिनांक दि. १३ मार्च,२०१३ च्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त मान्यतेच्या अनुषंगाने वरोरा नगरपरिषद हद्दीतील गांधीसागर तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी निधी मुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य योजनेतील राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत वरोरा नगरपरिषद हद्दीतील गांधीसागर तलावाचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी एकुण मंजूर रु. **३,६१,२०,९५१ /- (अक्षरी रूपये तीन कोटी एकसष्ठ लाख वीस हजार नऊशे एकाव्वन फक्त)** पैकी अनुज्ञेय राज्य हिस्स्यांचे ८० टक्के म्हणजेच रुपये **२,८८,९६,७६१ /- (अक्षरी रूपये दोन कोटी अठ्ठ्याऐंशी लाख शह्याण्णव हजार सातशे एकसष्ठ फक्त)** उपलब्ध करून द्यावयाचे आहे. त्यापैकी , **पहिला हप्ता म्हणून रुपये १००.०० लाख (अक्षरी रूपये एक कोटी फक्त)** इतकी रक्कम या शासन निर्णयाद्वारे **मुख्याधिकारी, वरोरा नगरपरिषद** यांना वितरीत / मुक्त करण्यास संदर्भाधीन दिनांक. १३ मार्च,२०१३ च्या शासन निर्णयातील सर्व मार्गदर्शक तत्वे, अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

२. यासाठी **मुख्याधिकारी, वरोरा नगरपरिषद, (Chief Officer, Warora Municipal Council, Chandrapur ) यांचे नावे रुपये १००.०० लाख (अक्षरी रूपये एक कोटी फक्त ) एवढया निधीचा धनादेश काढण्यात यावा.**

**३.** "वरोरा नगरपरिषदेस अदा करावयाचा रू. १००.०० लाख अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून मुख्याधिकारी, वरोरा नगरपरिषद यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री.दे.के.मानकर, अवरसचिव, पर्यावरण विभाग व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. सो.ना.बागुल, उपसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी **मुख्याधिकारी, वरोरा**

**नगरपरिषद** यांना **रू. १००.०० लाख (अक्षरी रूपये एक कोटी फक्त )** अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

४. सदर होणारा खर्च मागणी क्र. यू-४,३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण-०४-प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण (१०३) वायू व जल प्रदुषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२)(०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना-(३४३५ ०१ ८२), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावी व ती सन २०१२-१३ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावी.

५. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौ.संदर्भ क्रमांक १५६/१४६१ दिनांक १५/३/२०१३ आणि वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौ.संदर्भ क्रमांक १८/१३/व्यय १६ दिनांक १८/३/२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www. maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१३०३२८११५७२८७९०४ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दे.के.मानकर)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
मुख्याधिकारी, वरोरा नगरपरिषद, चंद्रपूर
संचालक, नगरपालिका प्रशासन वरळी, मुंबई.
मा. मंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-१६/ अर्थसंकल्प -७, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, कार्यासन-१४६१, मंत्रालय, मुंबई.
रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.